BJP - SHIVSENA ALLIANCE

1, Jalaram Nagar, Vallabhabaug lane, Opp. Gandhi Market, Ghatkopar (E),
Mumbai - 400 077 • Tel.: 2514 9978, 2514 7889

कृपया प्रसिद्धीसाठी                                                    दि.१९.एप्रिल २००९

# रमाबाई आंबेडकर नगरात किरिट सोमैया यांचे उत्स्फुर्त स्वागत- हजारोंच्या संख्येत निघाली प्रचार फेरी

काँग्रेस राजवटमे या तो आतंकवादी की गोली मार गयी, उससे बचे तो मंदी मार गयी, और बाकी कुछ बचा तो महंगाई मार गयी, असे उदगार ईशान्य मुंबईचे भाजपा-शिवसेना युतीचे उमेदवार श्री.किरिट सोमैया यांनी घाटकोपर येथील रमाबाई आंबेडकर नगरात प्रचार फेरीत काढले.

श्री.सोमैया रमाबाई आंबेडकर नगरात आले तेव्हा तेथील नागरिकांनी हजारोंचा संख्येत त्यांचे उत्स्फुर्त स्वागत केले. श्री.जोगेंद्र कवाडे यांच्या पीपल्स रिपब्लिकन पार्टीने सामैया यांना पाठिंबा दिल्याने त्यांचे कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

शिवशक्ती व भिमशक्ती यांचा एक आगळा संगम तेथे दिसला.

आपल्या भाषणासाठी जीवन आवश्यक वस्तुची पाकीटे मतदारांना दाखवत सोमैया मतदारांना आपला मुद्दा पठवून देत होते. गावात जवळच असलेल्या किराणा मालाचा दुकानात मतदारां सोबत जीवन आवश्यक वस्तुंचे भाव त्यांनी विचारले व तया वेळी खालील माहीती मिळाली.

| | | | |
|---|---|---|---|
| तूर डाळ | : रु.५२/-प्रति किलो | साखर | : रु.२८/-प्रति किलो |
| तांदूळ | : रु.२१/-प्रति किलो | गहू | : रु.२२/-प्रति किलो |
| शेंगदाणे तेल | : रु.८१/-प्रति किलो | गुळ | : रु.३८/-प्रति किलो |
| दूध | : रु.३०/-प्रतिलिटर | | |

जीवन आवश्यक वस्तुं बरोबर विजेची बीले दुप्पट झाली असल्याची माहीती सेमौया यांनी दिली. त्यांनी केंद्र व राज्यातील काँग्रेस व राष्ट्रवादी आघाडी सरकारावर चौफेर ताशेरे ओढले. ते म्हणाले की आतंकवादाला आळा घालणे, महागाईवर रोक लावणे, लोकांना रोजगार पुरवणे आदी सर्व विषयांवर हे सरकार नाकाम ठरले आहे.

आपण निवडून आल्यानंतर मुंबईच्या जनतेसाठी आपण खालील गोष्टी एका वर्षात करुन दाखवू असे श्री.सोमैया यांनी सांगितले:

- कुर्ला ते ठाणे रेल मार्गाचे एका वर्षात सहा पदरीकरण
- एस.आर.ए.स्कीम पुनरुज्जिवित करुन झोपडपटटीवासियांचे पुनर्वसन
- मुलुंड, भांडूप, कांजूर येथील लोडशेडिंग बंद करणे
- घरोघरी पाईप गॅस

**दयानंद नेने**
**9004028575**

Photographs available on www.kiritsomaiya.com



N-E Mumbai Candidate : Kirit Somaiya